



# दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ   Mob- 9822720784   Email- jansanchlan@gmail.com   Title Code- MAHMAR-51647

वर्ष ३ रे   अंक : ७३४ . वा   गुरुवार   दि. ११ एप्रिल २०२४   पृष्ठ ८   किंमत ३रुपये


# राज ठाकरे घाबरले असतील, मोदी सरकारने कुठली तरी नस दाबली असेल- वडेट्टीवारांची घणाघाती टीका...

**वृत्तसंस्था/ नागपूर**

राज ठाकरे यांनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला आहे. गुढीपाडव्याच्या बैठकीत मनसे अध्यक्ष राष्ट्रीय लोकसभा निवडणुत महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला. मी हा निर्णय फक्त नरेंद्र मोदींसाठी घेत आहे, असे राज ठाकरे म्हणाले होते. त्यांच्या पाठिंब्यानंतर विजय वडेट्टीवार यांनी राज ठाकरेंवर हल्लाबोल करत जोरदार टीका केली आहे. विजय वडेट्टीवार म्हणाले इतक्या लवकर वाघाची शेळी होईल आणि शेळी गवत खायला सुरुवात करेल असे वाटले नाहीराज ठाकरे ज्यावेळेस दिल्ली दरबारी गेले त्याच वेळेस ते भाजपसोबत किंवा मोदींना पाठिंबा देतील हे सर्व महाराष्ट्रातील जनतेला कळलं होतं. पण वाघ एवढ्या लवकर गवत खायला, सुरुवात करेल अशी अपेक्षा कोणालाही नव्हती आणि बिनशर्त पाठिंबा हा देत असताना उद्या लाव रे व्हिडिओ म्हणण्यापेक्षा काढ रे व्हिडिओ, काढून टाक रे व्हिडिओ म्हणायची पाळी राज ठाकरेंवर आली आहे. राज ठाकरे सारखा लढवय्या नेता मात्र गुलामगिरीचे जोखंड गळ्यात घालून वावरतील काय...? असा सवालही विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. वाघाची शेळी झाली आणि शेळी गवत खायला लागली अशी अवस्था भाजपमध्ये गेल्यावर राज ठाकरेंची होऊ नये, असे मराठी माणसांना वाटते. ज्यांच्या सभांनी विरोधकाचे धाबे दणाणले होते. मात्र, आता त्यांची सभा ही मोदींचे गुणगान गाण्यात जात असेल तर त्या सभेमध्ये काही राम नसेलवडेट्टीवार पुढे म्हणाले, राज ठाकरे यांच्या महायुतीत सामील झाल्यामुळे महाविकास आघाडीच्या मतांवर कोणताही परिणाम होणार नाही. कदाचित राज ठाकरे घाबरले असतील. मोदी सरकारने राज ठाकरेंची कुठले तरी नस दाबली असावी, ती दुखणारी आहे की दूध देणारी आहे हे येणाऱ्या काळात कळेल पण कुछ ना कुछ दाल मे जरूर काला है . यासाठीच आज राज ठाकरे सारखा नेता दिल्ली दरबारी पहिले वाकून आला, आता कमरेपासून झुकला



आहे, हे मान्य होणारे नाही. त्यामुळे महाविकास आघाडीवर याच्या काही परिणाम होणार नाही, असे वडेट्टीवार म्हणाले.

---

# खुनाचा प्रयत्न करून पलायन करणाऱ्या आरोपींना पोलिसांनी केले ५ तासांच्या आत अटक

## चिखली येथे घडली होती घटना लोणार येथून २ आरोपींना पकडले...

**जनसंचलन/ चिखली**

स्थानिक आठवडी बाजार परिसरात ९ एप्रिलच्या रात्री १०:०० वाजेच्या सुमारास एका व्यक्तीच्या डोक्यात फरशी टाकून जीवे मारण्याचा प्रयत्न झाला होता. या घटनेतील व्यक्ती गंभीर जखमी आहे. दरम्यान, या गंभीर घटनेची त्वरित दखल घेत चिखली पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या दोन आरोपींना लोणार येथून अवघ्या पाच तासात अटक केली. ९ एप्रिलच्या रात्री आठवडी बाजार परिसरातील गजानन टी सेंटरसमोर राजू नंदू डोळफोडे (४०, रा. इंदिरानगर, चिखली) यांच्यावर दोन अज्ञात व्यक्तींनी जीवे मारण्याच्या उद्देशाने डोक्यात फरशी मारून गंभीर जखमी केले. पोलिसांना त्याची माहिती मिळताच जखमीस बेशुद्ध अवस्थेत आधी बुलढाणा व तेथून अकोला व



नंतर नागपूरला हलविले. या घटनेत पीडित जखमी असल्याने ही घटना कोणी व का केली? याचा तपास करण्याचे पोलिसांसमोर आव्हान होते. त्यानुषंगाने ठाणेदार संग्राम पाटील यांनी तपास व आरोपीच्या शोधार्थ नेमलेल्या पथकाने गोपनीय व तांत्रिक माहितीच्या आधारे जखमी राजू डोईफोडे यास आरोपी विनोद रामचंद्र लाखाडे व सचिन आत्माराम राठोड (दोन्ही रा. लोणार) यांनी जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने मारहाण केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिस लोणार येथे पोहोचले व आरोपींना शिताफीने ताब्यात घेतले. ठाणेदार संग्राम पाटील यांच्या नेतृत्वात एपीआय संजय मातोंडकर, पीएसआय शरद भागवतकर, पीएसआय नितीनसिंह चव्हाण, पोलिस अंमलदार विजय किटे, अमोल गवई, चंद्रशेखर मुरडकर, राहुल पायघन, नीलेश सावळे, प्रशांत धंदर, सागर कोल्हे, पंढरी मिसाळ, राजेश मापारी, सुनील राजपूत यांनी कारवाई केली आहे.

# घाटबोरी येथे जुगारावर टाकला छापा

## दहा हजार २७० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**जनसंचलन/ डोणगाव**

येथून जवळच असलेल्या घाटबोरी येथे पोलिसांनी छापा टाकून जुगार खेळणाऱ्या सात जणांना रंगेहात पकडले. त्यांच्याकडून दहा हजार २७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वासुदेव देवसिंग जाधव (५५, रा. टेंबुरखेड), संजय बाबुसिंग राठोड, (रा. झाडी, अकोला), माणिक जानू पवार (रा. टेंभूरखेड), दगडू मारोती शिंदे (नागेशवाडी), विजय खंडू शिंदे, दिनकर जानकीराम डाखोरे यांच्यासह अन्य एकोला जुगार खेळताना डोणगाव पोलिसांनी रंगेहात ताब्यात घेतले. पीएसआय संदीप साळवे, पोलिस कॉन्स्टेबल पवन गाभणे, निखिलेश चव्हाण यांच्यासह सहकाऱ्यांनी हिकारवाई केली. त्यांच्या



यामध्ये आरोपींकडून १० हजार २७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास डोणगाव पोलिस ठाण्यातील सहायक फोजदार गणेश डव्हळे करीत आहेत. दरम्यान कारवाई करणाऱ्यांमध्ये एका जिल्हा परिषद शिक्षकाचाही समावेश होता अशी चर्चा आहे. ग्रामीण भागात आता जुगार खेळणाऱ्यांचे प्रमाणही वाढत असल्याचे चित्र आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मंदिराजवळ प्राण्यांचा बळी देण्यास प्रतिबंध...

**जनसंचलन/बुलढाणा**



जिल्ह्यातील विविध यात्रा, तसेच उरुस दरम्यान प्राण्याचा बळी देण्याची प्रथा आहे. त्यावेळेस अंधश्रद्धेपोटी कोणत्याही प्राण्याचा मंदिर किंवा श्रद्धास्थळाजवळ बळी दिला जाणार नाही याची खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आल आहे. उत्सव साजरा करताना स्थानिक प्रशासन आणि पोलिस पाटील यांनी कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडणार नाही, याची खबरदारी घ्यावी. याबाबत स्थानिक भागात जनजागृती करावी. तसेच उत्सव साजरा करताना प्राण्याचा बळी द्यावयाचा असल्यास मंदिर किंवा श्रद्धास्थळाजवळ देण्यात येऊ नये. त्याची इतरत्र स्वतंत्र व्यवस्था करुन उत्सव साजरा करावा. त्यानंतर सदर जागेची स्वच्छता करण्याची दक्षता घेण्यात यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले

# हमीदराने मका खरेदीसाठी नोंदणी करण्याचे आवाहन

## ३० एप्रिलपर्यंत नोंदणी करावी लागणार...

**जनसंचलन/बुलढाणा**

रब्बी हंगामामध्ये जिल्ह्यामध्ये केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत योजनेंतर्गत भरडधान्य मका हमीदराने खरेदी करण्यात येणार आहे. यासाठी दि. ३० एप्रिल २०२४ पर्यंत नोंदणी करावी लागणार आहे. जिल्ह्यामध्ये मका खरेदीसाठी नोंदणी सुरु करणेसाठी १६ खरेदी केंद्राना मान्यता दिलेली आहे. यात तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री समिती मर्यादित, बुलढाणा, लोणार, मेहकर, शेगाव, संग्रामपूर, मलकापूर, जळगाव जामोद व खामगाव, संत गजानन कृषि विकास शेतकरी उत्पादक कंपनी, मोताळा, सोनपाऊल ॲग्रो प्रोड्युसर कंपनी, अंजनी बु. केंद्र - साखरखेर्डा, माँ जिजाऊ फार्मर प्रोड्युसर कंपनी, देऊळगावराजा केंद्र सिंदखेडराजा, नांदुरा ॲग्रो फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड, नांदुरा, स्वराज्य शेतीपूरक सहकारी संस्था, चिखली, ऑर्गसत्व ऑर्गनिक फार्मर प्रोड्युसर कंपनी, देऊळगावराजा, कृषी उत्पन्न बाजार समिती, संग्रामपूर केंद्र वरवंड बकाल, बिबी फार्मर प्रोड्युसर कंपनी बिबी केंद्र बिबी या केंद्रांना मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हा पणन अधिकारी यांनी जिल्ह्यामध्ये सदर ठिकाणी मका खरेदीसाठी नोंदणी सुरु करण्याचे आदेश दिले आहे. त्यानुसार शेतकऱ्यांनी खरेदी केंद्रावर नोंदणी करणेसाठी, आधारकार्ड, खरीप २०२३-२४ चा सातबाऱ्याचा ऑनलाईन पिकपेरा, बँक पासबुकची आधारलिंक केलेली झेरॉक्स, मोबाईल नंबर घेऊन कागदपत्रे स्कॅन करुन शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात यावी. तसेच हाताने लिहिलेले सातबारा आणि खाडाखोड केलेले कागदपत्र कोणत्याही परिस्थितीत स्विकारण्यात येणार नाहीत. शासनाने दिलेल्या कालावधीमध्ये शेतकरी नोंदणी होणार असल्यामुळे रोजच्या रोज नोंदणीसाठी आलेल्या शेतकऱ्यांचे अर्ज त्याच दिवशी पोर्टलवर नोंदणी करुन घ्यावयाचे आदेश देण्यात आले आहे. कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन अर्ज स्विकारल्या जाणार नाहीत. तसेच कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन सातबारावरील मका पिकपेऱ्यापेक्षा जास्त क्षेत्रावर नोंदणी करण्यात येणार नाही. तसे झाल्यास यास खरेदी केंद्र जबाबदार राहणार आहे, असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी एम. जी. काकडे यांनी केले आहे.

# हातचलाखीने पैसे काढून एटीएम धारकाची फसवणूक

**जनसंचलन/मोताळा**

हातचलाखी करत एकाने एटीएमची अदलाबदल करून मोताळ्यात एकाची १६ हजार रुपयांनी फसवणूक केल्याची घटना ७ एप्रिल रोजी दुपारी घडली. प्रकरणी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. मोताळा येथील वॉर्ड क्र. १५ मध्ये वास्तव्यास असलेले सचिन डिगांबर वाकोडे यांनी या प्रकरणी तक्रार दिली आहे. त्यानुसार ७ एप्रिल रोजी दुपारी ते पैसे काढण्यासाठी बोराखेडी येथील तहसील चौकातील एटीएमवर गेले होते. दरम्यान, त्यांनी एटीएममधून पैसे काढण्याचा प्रयत्न केला असता एटीएममधून पैसे निघाले नाहीत. यावेळी त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या अनोळखी युवकाने हातचलाखीने त्यांचे एटीएम कार्ड बदलून दुसरे एटीएम कार्ड देत त्यांच्या खात्यातून १६ हजार रुपये काढून घेतले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी बोराखेडी पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास नायक पोलिस कॉन्स्टेबल अमोल खराडे हे करीत आहेत.

# मोटारसायकल रॅलीद्वारे केले होमिओपॅथीसंबंधी जनजागरण...

## जागतिक होमिओपॅथी दिनानिमित्त होमिओ तज्ञांचे आयोजन

**जनसंचलन/बुलढाणा**



जागतिक होमिओपॅथी दिनानिमित्त स्थानिक होमिओतज्ञांनी १० एप्रिल रोजी शहराच्या मुख्य मार्गावरुन मोटारसायकल रॅली काढली व होमिओपॅथीसंबंधी जनजागरण केले. होमिओपॅथीचे जनक डॉ. सॅम्युएल हॅनिमन यांच्या जयंतीनिमित्त १० एप्रिल रोजी संपूर्ण जगात होमिओपॅथी दिन साजरा करण्यात येतो. येथील होमिओ तज्ञांच्या असोसिएशनने देखील यानिमित्ताने १० एप्रिल रोजी जनजागरण रॅलीचे आयोजन केले होते. स्थानिक संगम चौकातील छ. शिवाजी महाराज स्मारकापासून मोटारसायकल रॅलीला प्रारंभ करण्यात आला. आयएमएचे अध्यक्ष डॉ. अजित शिरसाट, डॉ शोन चिंचोले, आयडीएचे सचिव डॉ. सचिन किनगे, जेष्ठ होमिओतज्ञ डॉ. अजय ढगे, डॉ. ए. यु. शेख, डॉ आशिष खासबागे, डॉ. सॅम्युएल हॅनिमन जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष डॉ. दुर्गासिंग जाधव, सचिव डॉ. सागर जोशी यांच्या उपस्थितीत रॅलीला हिरवी झेंडी दाखविण्यात आली. होमिओपॅथीसंबंधी जनजागरण करण्यासाठी तयार करण्यात आलेले घोषवाक्य तसेच होमिओपॅथीची माहिती देत शहराच्या प्रमुख मार्गावरुन रॅली काढण्यात आली. दरम्यान जयस्तंभ चौक येथे गो व्होटचा संदेश देणारे फलक झळकावून मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहनही नागरीकांना करण्यात आले. रॅलीचा समारोप जांभरुन रोडवरील डॉ. अजय ढगे यांच्या जुन्या दवाखाना परीसरात करण्यात आला. येथे डॉ. सॅम्युएल हॅनिमन यांच्या अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी डॉ. अजय ढगे, डॉ. दुर्गासिंग जाधव, पत्रकार राजेंद्र काळे, डॉ. गजानन सुरडकर, डॉ. ए. यु. शेख, डॉ. स्वाती मसने, मयूर राजा यांची प्रमुख उपस्थिती होती. होमिओपॅथी मानवाला वरदान असून दुष्परिणाम विरहीत उपचारांमुळे रुग्णांसाठी अत्यंत उपयुक्त ठरते. याबाबत जनजागृती करण्यासाठी वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे यावेळी असोसिएशनतर्फे जाहीर करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सागर जोशी यांनी केले तर डॉ. पवन बजाज यांनी आभार मानले. मोटारसायकल रॅली व अभिवादन कार्यक्रमाला डॉ. सौ. पल्लवी जोशी, डॉ. दीपक बढे, डॉ. गोपाल उबरहंडे, डॉ. सौ. निलिमा जाधव, डॉ. सौ. दिशा चोपडे, डॉ. सौ. दीपाली बारोटे, डॉ. अभिजित पाटील डॉ. रसिका वानखेडे, डॉ. उमेश जाधव डॉ.सौ. मनिषा राठी, डॉ. सौ.दीपाली जोशी, डॉ. प्रवीण भाले, डॉ. रोहित देशपांडे, डॉ सौ. स्वाती लड्ढा, डॉ सौ. कावेरी सावळे, डॉ. सौ.किरण भुसारी, डॉ.सौ. शीतल उबरहंडे, डॉ. सौ. दीपाली जैस्वाल, डॉ. सौ. विजया नरवाडे, डॉ. सौ. अरुणा गोरे, डॉ. जागृती खरे, डॉ. गणेश वसू, ॲड. सौरभ ढगे , डॉ. राजेंद्र गणगे, दिनेश राठी, डॉ. अंशुमन जैस्वाल, डॉ. श्रीराम जोशी, डॉ. गायत्री सावजी, अनिता कापरे , शशिकांत इंगळे, तुषार काचकुरे, पवन बाबरेकर, डॉ. अशोक बडगुजर, डॉ. यशवंत पाटील यांच्यासह बुलढाणा होमिओपॅथिक असोसिएशनचे सर्व सभासद उपस्थित होते.

# मोताळ्याचा आठवडी बाजार भरणार शुक्रवारी

**जनसंचलन/मोताळा**



येथील दर गुरुवारी भरणार आठवडी बाजार हा रमजान ईदनिमित्त १२ एप्रिलला शुक्रवारी भरविण्यात येणार आहे. येथे दर गुरुवारी आठवडी बाजार भरविण्यात येतो. त्यामध्ये अनेक नागरिक तथा व्यावसायिक हजेरी लावतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात गर्दी होते. यावेळी ११ एप्रिलला गुरुवारी रमजान ईद येत आहे. त्यामुळे आठवडी बाजारात नागरिकांना अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पोलिस प्रशासनाच्या वतीने आठवडी बाजार हा गुरुवार ऐवजी शुक्रवारी भरविण्याची विनंती पोलिसा प्रशासनाच्या वतीने नगरपंचायत प्रशासनाला करण्यात आली आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्ना निर्माण होऊ नये याकरिता ११ एप्रिलला गुरुवारी भरणारा आठवडी बाजार हा शुक्रवारी (दि.१२) भरविण्यात येणार आहे. त्याबाबत नगरपंचायतीनेही स्पष्टपणे तशी सूचना दिली आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# गाळमुक्त धरण उपक्रमासाठी नागरिकांनी सहकार्य करावे-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

जनसंचलन/बुलडाणा

गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार हा उपक्रम राज्य शासनातर्फे राबविण्यात येत आहे. यात धरणातील गाळ काढून शेतामध्ये टाकण्यात येणार आहे. यामुळे पाणी साठवण क्षमता वाढण्यासोबतच शेतीची सुपिकता वाढण्यास मदत होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी या उपक्रमाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.




गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेचा आढावा आज जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आला. यावेळी जिल्ह्यातील विविध संस्थांकडे सोपविण्यात आलेल्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. जिल्ह्यातील ४७ तलावातील गाळ काढण्यात येणार आहे. या तलावातील गाळ काढण्यासाठी आवश्यक त्या प्रक्रिया पूर्ण करण्यात याव्यात. संबंधित संस्थांना कार्यारंभ आदेश तातडीने देण्यात यावे. तसेच संस्थांनी गाळ काढण्याची कामे विनाविलंब सुरू करावीत. गाळ काढण्यामुळे तलावातील पाणी साठवण क्षमता वाढणार आहे. तसेच हा गाळ शेतीमध्ये टाकण्यात आल्यामुळे सुपिकता वाढणार आहे. त्यामुळे या उपक्रमाला नागरिकांनी सहकार्य करावे. तलावातील गाळ शेतामध्ये नेण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा. गाळ घेऊन जाऊन शेतकऱ्यांनी आपली शेती सुपिक करावी, यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा. तसेच हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी हातभार लावावा. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने सकाळी लवकर ही कामे सुरू करून सायंकाळपर्यंत गाळ काढण्यात यावा. परिसरातील नागरिकांना या गाळ काढण्याच्या उपक्रमाची माहिती घ्यावी. त्यांचा यामध्ये सहभाग घेण्यात यावा. येत्या काळात पावसाळ्याचे दिवस असल्याने ही कामे निश्चित केलेल्या मुदतीत पूर्ण करावीत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले.

# १४ एप्रिलचा आठवडी बाजार रद्द

जनसंचलन/बुलढाणा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती दि. १४ एप्रिल रोजी असल्याने या दिवशीचा बुलडाणा येथील आठवडी बाजार रद्द करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३वी जयंती निमित्ताने सकाळी ८ वाजता बुलढाणा येथील जयस्तंभ चौक येथे भिम पाळणा आणि माजी सैनिक व समता दलाच्या वतीने मानवंदना देण्यात येणार आहे. तसेच शहरातून महिलांची मोटार सायकल रॅली काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीमध्ये नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होतात. तसेच रविवार हा आठवडी बाजाराचा दिवस असल्याने शहरमधील मुख्य मिरवणूक मार्गावरील रस्त्यावर आठवडी बाजार भरतो. या आठवडी बाजारातही गर्दी असते. त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होते. त्यामुळे दि. १४ एप्रिल रोजीचा बुलडाणा शहरातील रविवारचा आठवडी बाजार रद्द होऊन इतर दिवशी आठवडी बाजार भरविण्यात यावा, अशी विनंती पोलीस अधीक्षकांनी केली आहे. त्यानुसार बाजार आणि यात्रा कायदा १८६२च्या कलम ५ नुसार जिल्हाधिकारी यांना दिलेल्या अधिकारानुसार रविवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी होत असल्यामुळे कायदा व सुव्यवस्था तसेच वाहतुकीस अडचण निर्माण होणार नाही, या दृष्टीकोनातून शहरामध्ये भरणारा आठवडी बाजार रद्द करण्यात येत आहे. सदर आठवडी बाजार त्या पुढील दिवशी भरविण्यात येणार आहे.

# आरोग्य दूतांचे आवाहन, चला जाऊया मतदानाला

## निर्विघ्न मतदान प्रक्रियेसाठी आरोग्य विभाग दक्ष...

जनसंचलन/मेरा बु

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी ग्रामीण आणि शहरी भागातील प्रत्येक मतदान केंद्रावर नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्य विभाग सज्ज झाला आहे. जिल्ह्यातील सर्व मतदारांनी कुठलीही आरोग्यविषयक काळजी न करता आपले मतदनाचे कर्तव्य पार पाडावे, त्यासाठी संपूर्ण मतदान प्रक्रियेच्या वेळेत आरोग्यदूत मतदान केंद्रावर आरोग्य सेवेसाठी उपलब्ध आहेत, असा संदेश आज आरोग्य प्रशासनाने दिला. येत्या दि. २६ एप्रिल रोजी लोकसभा मतदारसंघातील १ हजार ९६२ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. त्या अनुषंगाने मतदारांनी लोकशाहीच्या उत्सवात उत्साहाने सहभागी होऊन मतदानाचे कर्तव्य पार पाडावे, यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपाययोजना करण्यात येत आहे. मतदारांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी ग्रामीण आणि शहरी भागातील आरोग्य विभागही पुढे सरसावला असून उन्हाळ्याचे दिवस आणि वाढते तापमान लक्षात घेता मतदान केंद्रावर कोणतीही आकस्मिक बाब उद्भवल्यास त्यास सामोरे जाण्यासाठी आरोग्य विभाग पूर्वतयारी करीत आहे. आज संपूर्ण जिल्ह्यात जिल्हा सामान्य रूग्णालय, उप रूग्णालय आणि ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून मतदारांना ङ्गगो वोटचला जाऊया मतदानालाफ या व्यापक मतदार जाणीव जागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन, जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. सुभाष चव्हाण, जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांच्या पुढाकाराने आरोग्य प्रशासनातर्फे आज उपक्रम घेण्यात आला. जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सज्ज असून सर्व मतदारांनी चिंता न बाळगता आत्मविश्वासाने आपले मतदनाचे कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. सुभाष चव्हाण यांनी जिल्हा सामान्य रूग्णालयात आयोजित कार्यक्रमात केले.




यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. भागवत भुसारी, कार्यकारी अभियंता विशाल पिंपळे, डॉ. सुरेश घोलप, डॉ. जगदीश डुकरे, डॉ. भिलावेकर तसेच जिल्हा सामान्य रूग्णालयातील कर्मचारी उपस्थित होते. आगामी लोकसभा निवडणूकीच्या दृष्टीने सर्व मतदान केंद्रावरील किमान पायाभूत सुविधांमध्ये आरोग्य विभागातर्फे प्रत्येक मतदान केंद्रावर आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहे. तसेच प्रथमोपचार पेटीसह आरोग्यविषयक संदर्भीय सेवा उपलब्ध असणार आहेत.

# आरसेटी तर्फे शेळीपालन प्रशिक्षण...

जनसंचलन/बुलडाणा

सेंट्रल बँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेतर्फे देऊळगाव माळी येथे दहा मोफत शेळीपालन प्रशिक्षण पार पडले. संस्थेचे संचालक संदीप पोटे यांनी सर्व प्रशिक्षणार्थी महिलांना प्रेरित करून संस्थेची माहिती दिली. त्याचबरोबर ध्येयनिश्चिती आणि शासकीय योजनांबद्दल अधिक माहिती देऊन बँकिंग आणि ईडीपीविषयी माहिती दिली. प्रशिक्षणादरम्यान सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या मेहकर शाखेचे व्यवस्थापक आशिष मोरे यांनी प्रशिक्षणाला भेट दिली. शेळीपालन प्रशिक्षक ऋषीकुमार फुले यांनी शेळीपालना विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी प्रशिक्षक स्वप्नील गवई, श्रीकृष्ण राजगुरे, सहाय्यक प्रशांत उबरहंडे, मनीषा देव आणि कल्पना पोपळघट यांनी मार्गदर्शन केले. आरसेटी तर्फे बेरोजगार सुशिक्षित तरुण-तरुणींना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण देण्यात येते. या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास इच्छुकांनी सेंट ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था, बुलढाणा येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# एलसीबीची जळगाव जामोद तालुक्यात कारवाई एकास अटक...

## देशी कट्ट्यासह १७ काडतुसे केले जप्त




अटक केलेल्या आरोपीसह जप्त केलेला देशी कट्टा व पथकातील कर्मचारी.

जनसंचलन/जळगाव जामोद

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिस विभाग अलर्ट मोडवर आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने देशी कट्टा विकण्याच्या प्रयत्नात असलेल्या एकाला ८ एप्रिल रोजी जळगाव जामोद तालुक्यातील खेड शिवारातून अटक केली, त्याच्याकडून देशी कट्ट्यासह १७ जीवंत काडतुसे आणि इतर ऐवज, असा ७७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जळगाव जामोद पोलिस स्टेशनच्या हद्दीत एक जण अग्निशस्त्र विकणार असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. पथकाने गुप्त माहितीच्या आधारे आरोपी शेख जमीर शेख चाँद (वय ३१, रा. टिपू सुलतान चौक, खेड शिवापूर, जामोद, जि. बुलढाणा) यास अटक केली. त्याच्याकडून देशी बनावटीचे एक अग्निशस्त्र किंमत ४० हजार, १७ जीवंत काडतुसे किंमत १७ हजार, स्टीलची मॅगझिन किंमत पाच हजार, एक मोबाइल किंमत १५ हजार, असा ७७ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक सुनील कडासने, अपर पोलिस अधीक्षक बुलढाणा महामुनी, अपर पोलिस अधीक्षक खामगाव अशोक थोरात, उपविभागीय पोलिस अधिकारी मलकापूर गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक अशोक लांडे यांच्या आदेशाने करण्यात आली. या पथकात एपीआय आशिष चेचरे, पीएसआय श्रीकांत जिंदमवार, हेकॉ दीपक लेकुरवाळे, एनपीसी गणेश पाटील, पुरुषोत्तम आघाव, युवराज राठोड यांचा समावेश होता.

# महायुतीचे भिजत घोंगडे आठ मतदारसंघातील उमेदवारांवर खल सुरूच अंतिम निर्णयाची प्रतिक्षा...



वृत्तसंस्था/मुंबई

लोकसभा निवडणुकांसाठी तिसऱ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज भरण्यास येत्या दोन दिवसांत अर्थात १२ एप्रिलपासून सुरुवात होत असताना अजूनही महायुतीच्या जागांचा तिढा पूर्णपणे सुटलेला नाही. मुंबईतील दक्षिण मुंबई, उत्तर पश्चिम मुंबई, उत्तर मध्य मुंबई या तीन जागा तसेच ठाणे, पालघर, रत्नागिरी सिंधुदुर्ग, नाशिक आणि संभाजीनगर अशा आठ जागांवर अजूनही महायुतीमध्ये एकमत झालेले नाही. आघाडीचे जागा वाटप पूर्ण झाले असताना महायुतीचे जागांचे भिजत घोंगडे का, असा प्रश्न महायुतीचेच पदाधिकारी आणि कार्यकर्ते विचारत आहेत.मुंबई : लोकसभा निवडणुकांसाठी तिसऱ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज भरण्यास येत्या दोन दिवसांत अर्थात १२ एप्रिलपासून सुरुवात होत असताना अजूनही महायुतीच्या जागांचा तिढा पूर्णपणे सुटलेला नाही. मुंबईतील दक्षिण मुंबई, उत्तर पश्चिम मुंबई, उत्तर मध्य मुंबई या तीन जागा तसेच ठाणे, पालघर, रत्नागिरी सिंधुदुर्ग, नाशिक आणि संभाजीनगर अशा आठ जागांवर अजूनही महायुतीमध्ये एकमत झालेले नाही. आघाडीचे जागा वाटप पूर्ण झाले असताना महायुतीचे जागांचे भिजत घोंगडे का, असा प्रश्न महायुतीचेच पदाधिकारी आणि कार्यकर्ते विचारत आहेत.दक्षिण मुंबई या लोकसभा मतदार संघासाठी भाजप इच्छुक असून, शिंदे यांच्या शिवसेनेनेही या मतदारसंघावर दावा केला आहे. शिवसेनेकडून तगड्या उमेदवाराचे नाव अद्याप पुढे आलेले नसताना भाजपकडून राहुल नार्वेकर आणि मंगलप्रभात लोढा यांच्या नावासाठी जोर आहे. ही जागा नेमकी कुणाला सोडायची, यावर अजूनही खलबते सुरू आहेत. उत्तर पश्चिम मुंबईमध्ये ठाकरे गटाने अमोल कीर्तिकर यांना उमेदवारी जाहीर केलेली असताना येथून अद्याप महायुतीचा उमेदवार ठरलेला नाही. शिवसेना-भाजप अशा दोघांनीही या मतदारसंघावर दावा केला असला तरी अद्याप दोघांकडेही निवडून येणारा हक्काचा उमेदवार नसल्याचे समजते. उत्तर मध्य मुंबईमध्ये विद्यमान खासदार पूनम महाजन यांना बदलून तिथे जिंकून येणारा अन्य उमेदवार देण्याबाबत भाजप गांभीर्याने विचार करीत आहे. अनेक नावांबाबत भाजपने चाचपणीही केली आहे. मात्र अजूनही त्यांना अंतिम नाव निश्चित करता आलेले नाही. या जागेवर आता आमदार आशीष शेलार यांना उमेदवारी देण्याबाबत भाजप गांभीर्याने विचार करीत आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असलेल्या ठाणे जिल्ह्यातील ठाणे लोकसभा मतदारसंघावर भाजपने दावा केला असून शिवसेनाही ही जागा सोडण्यास तयार नाही. शिवसेनेकडून रवींद्र फाटक, नरेश म्हस्के इच्छुक आहेत तर भाजपकडून संजीव नाईक यांच्या नावाची चर्चा आहे. हा पेच सुटता सुटत नसून दोन्ही बाजूच्या पदाधिकाऱ्यांमध्ये गोंधळाचे वातावरण आहे. पालघर लोकसभा मतदारसंघात महायुतीकडून राजेंद्र गावित हेच उमेदवार असतील, असे सांगितले जात असले तरी ते शिवसेनेच्या की भाजपच्या चिन्हावर लढणार, हेच अजून निश्चित झालेले नाही. पालघरची जागा शिवसेनेची असून, राजेंद्र गावित यांनी पुन्हा शिवसेनेच्या चिन्हावर निवडणूक लढवावी, असा शिवसेनेचा दावा आहे. तर पालघर घ्या आणि ठाणे द्या असा भाजपकडून आग्रह असल्याचे समजतेत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघाबाबत आताच्या घडीला सर्वाधिक चर्चा सुरू आहे. या जागेवर शिवसेनेकडून किरण सामंत इच्छुक असून तसा त्यांनी दावाही केला होता. मात्र नंतर भाजपकडून नारायण राणे यांच्या नावावर जोर दिला गेल्यान्ंतर सामंत यांच्याकडून ही जागा सोडण्यात आल्याचे समाजमाध्यमांवर जाहीर करण्यात आले. मात्र लगेचच आधीची भूमिका बदलत या जागेवर पुन्हा दावा करण्यात आला आहे. दुसरीकडे नारायण राणे यांनी प्रचारालाही सुरुवात केल्याने या जागेवरचा तिढा कायम आहे. नाशिक लोकसभा मतदारसंघातून विद्यमान खासदार हेमंत गोडसे यांनाच उमेदवारी मिळावी, असा शिवसेनेचा आग्रह असताना भाजप मात्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना उमेदवारी देण्यासाठी आग्रह धरत आहे. विशेष म्हणजे तशा भाजपच्या दिल्लीतील शीर्षस्थ नेत्यांच्या सूचना असल्याचे कळते. त्यामुळे या जागेवरील उमेदवारी अद्याप जाहीर झालेली नाही. छत्रपती संभाजीनगरमधून पालकमंत्री संदीपान भुमरे यांचे नाव आघाडीवर आहे. दुसरीकडे मराठा क्रांती मोर्चातील विनोद पाटील यांच्या नावाचीही चर्चा आहे. मात्र अद्याप येथील उमेदवार निश्चित झालेला नाही.

## ट्रक व कारचा भीषण अपघातात तीन जण गंभीर जखमी

### समृद्धी महामार्गावर घडली हि घटना...

जनसंचलन/मलकापूर पांग्रा

समृध्दी महामार्गावर नागपूरहून मुंबईकडे जाणाऱ्या एका ट्रकने अचानक लेन बदलल्याने पाठीमागून येणारी कार ट्रकवर धडकडल्याने झालेल्या अपघातामध्ये तीनजण गंभीर जखमी झाल्याची घटना दि. १० एप्रिल रोजी दुपारच्या सुमारास घडली. प्राप्त माहितीनुसार, समृद्धी महामार्गावर एमएच-२२- व्ही- ०६४२ क्रमांकाची कार आणि ट्रक (आरजे ४७-जीए-६४७१) ही दोन्ही वाहने नागपूरकडून मुंबईकडे समृद्धी महामार्गावरून जात होती. दरम्यान, ट्रक (आरजे-४७-जीए-६४७१) ने त्याची लेन सोडून कारच्या लेनमध्ये तो घुसल्याने पाठीमागून येणारी कार (एमएच-२२- व्ही-०६४२) पाठीमागून ट्रकवर धडकली. त्यामध्ये प्रवीण छाजेड (वय ४५), संजय जहागीरदार (५०, दोघे, रा. छत्रपती संभाजीनगर) आणि असोदीन सिकंदर (रा. पुणे) हे तिघे जखमी झाले. यातील दोघेजण गंभीर जखमी आहे. दरम्यान, अपघातामध्ये ट्रकचालक शहा फजल खान (३५, रा. चोबपूर, यूपी) याला दुखापत झाली नाही. अपघातामध्येकारअसाचुराडाझालाहोता. अपघातामधील जखमींना तातडीने रुग्णावाहिकेद्वारे मेहकर येथील ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे प्रथमोपचार करून त्यांना तीन रुग्णवाहिकांद्वारे छत्रपती संभाजीनगर येथे




उपचारांसाठी हलविण्यात आले आहे. अपघाताची माहिती मिळताच बीबी पोलिस ठाण्याचे पोलिस कर्मचारी, तसेच महामार्ग पोलिसांचे अधिकारी पीएसआय गजानन उज्जैनकर व त्यांचे सहकारी घटनास्थळी दाखल झाले होते. त्यांनी दोन्ही वाहने टोईंग करून दुसरबीड येथील उपकेंद्रावर लावली.

## शेतकऱ्याची विहिरीत उडी घेऊन आत्महत्या

जनसंचलन/दुसरबीड

गुढीपाडव्याच्याच दिवशी विहिरीत उडी घेऊन एका ४५ वर्षीय शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची घटना ९ एप्रिल रोजी दुसरबीड येथे घडली. बबन रामलाल बिथे (४५) असे मृत शेतकऱ्याचे नाव ९ एप्रिल रोजी सकाळपासून ते बेपत्ता होते. त्यांचा नातेवाइकांनी शोध घेतला, परंतु ते सापडले नाहीत. १० एप्रिल रोजी एका शेतामधील विहिरीजवळ त्यांची दुचाकी उभी असलेली व शर्ट लटकवलेला दिसून आला. त्यामुळे शेताशेजारी असलेल्यांनी विहिरीजवळ जाऊन पाहिले असता गाडीला लटकवलेला शर्ट व एक



चिठ्ठी आढळून आली. याबाबत नंतर गावात तथा किनगाव राजा पोलिस ठाण्यात माहिती देण्यात आली. त्यानंतर किनगाव राजा पोलिसांनी घटनास्थळ गाठून विहिरीतील पाणी कृषीपंप लावून उपसण्यात आले. तेव्हा विहिरीमध्ये बबन बिथ्रे यांचे पार्थिव आढळून आले. पोलिसांनी पार्थिव उत्तरीय तपासणीसाठी पाठवले होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958